Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २६९ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.९ जुलै २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## राज्य मंत्रिमंडळांच्या बैठकीत मोठा निर्णय

# जागतिक पातळीवर पदकप्राप्त खेळाडूंना थेट सरकारी नोकरी मिळणार



**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्य मंत्रिमंडळ बैठकीत आज एक अतिशय महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. जागतिक किर्तीच्या अर्थात जागतिक पातळीवर पदक प्राप्त केलेल्या खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती मिळणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज याबाबतचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला. यामुळे आता राज्यातील खेळाडूंची मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ऑलिम्पिक स्पर्धा, पॅराऑलिम्पिक आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत पदक मिळविलेल्या खेळाडूंना या निर्णयाचा मोठा लाभ होणार आहे. दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज विधान भवनात पार पडली आहे. या बैठकीत पुरवणी मागण्या आणि वित्तनियोजन विधेयकावर देखील चर्चा झाल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.

राज्य सरकारने खेळाडूंबाबत घेतलेल्या या निर्णायमुळे विविध खेळांमध्ये चांगली कामगिरी करु इच्छुणाऱ्या तरुणांना प्रोत्साहन मिळणार आहे. विशेष म्हणजे राज्य सरकारने नुकतेच विश्वविजेता टीम इंडियाला वर्ल्ड जिंकल्याबद्दल ११ कोटींचं बक्षीस जाहीर केलं होतं. तसेच टीम इंडियातील मुंबईच्या चार खेळाडूंना प्रत्येकी एक कोटी रुपयांचं बक्षीस राज्य सरकारकडून देण्यात आले. वर्ल्ड कप विजेत्या संघातील मुंबईच्या चार खेळाडूंचा विधान भवनात सत्काराचा कार्यक्रम पार पडला.राज्यातील अनेक भागांमध्ये पाऊस पडत असल्यामुळे काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले. त्याचा फटका मुंबई शहराला देखील बसला. मुंबईत पडलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचलं. परिस्थिचे गांभीर्य ओळखून मुख्यमंत्र्यांनी आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वॉर रुममध्ये जावून कामकाजाची पाहणी केली. या दरम्यान एक महत्त्वाची बैठक स्थगित करण्यात आली.

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी अर्ज आमंत्रित

### २१ जुलै २०२४ पर्यंत अर्ज करण्याची मुदत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चंद्रपूर जिल्हयामध्ये इतर मागास प्रवर्ग (जइउ), विमुक्त जातीभटक्या जमाती (तगछढ), विशेष मागास प्रवर्ग (डइउ) व आर्थिक दुर्बल घटक (एथड) प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुलांचे व मुलींचे शासकीय वसतीगृह शासन निर्णय दिनांक १९ डिसेंबर, २०२३ अन्वये सुरु करण्यात आले आहे. यासाठी शासनाने भोजन, शैक्षणिक साहित्य, आरोग्य आदीसह सोयीसुविधा युक्त निवासाची व्यवस्था करण्यात येत आहे. सदर वसतीगृहात प्रवर्ग निहाय विहित आरक्षणानुसार व गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येणार आहे. इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना सदर वसतीगृह प्रवेशाकरीता सन २०२४-२५ या वर्षाकरीता अर्ज मागविण्यात येत आहे.

तसेच वसतीगृह प्रवेश सुलभ व्हावा, त्याच बरोबर वसतीगृहात सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात, या दृष्टीकोनातून वसतीगृहात प्रवेश घेण्याकरीता व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत तसेच बिगर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचाही समावेश वसतीगृह प्रवेशासाठी करण्यात येईल. उच्च शिक्षणासाठी वसतीगृहात प्रवेश घेण्याकरीता इयत्ता १२ वी मध्ये ६०टक्के किंवा त्याप्रमाणात ग्रेडेशन / उत्त्रक्ष-चे गुण असणे आवश्यक राहील. तसेच उत्पन्न मर्यादा २.५० लाखापेक्षा कमी असावे व वय मर्यादा ३० वर्षापेक्षा अधिक नसावे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीत विद्यार्थ्यास ऑफलाईन पध्दतीने संबंधित सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सामाजिक न्याय भवन, शासकीय दूध डेअरी मार्ग, चंद्रपूर यांच्याकडे २१ जुलै २०२४ पर्यंत अर्ज करणे अनिवार्य राहील. तरी सदर योजनेकरीता तात्काळ अर्ज सादर करण्यात यावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहायक संचालक आशा कवाडे यांनी केले आहे.

## एकाच पशू वैद्यकीय अधिकाऱ्याच्या खांद्यावर पाच गावांचा भार

### सांगा न साहेब, पशूंची वैद्यकीय सेवा कशी होणार



**सेलू । प्रतिनिधी**

सहा हजार लोकसंख्या असलेले गाव , गावात बहुतांश शेतकरी , लाखो रुपयांची पशू वैद्यकीय दवाखान्याची इमारत पण पशू वैद्यकीय अधिकाऱ्याला एकच दिवस सांगा न साहेब , कशी होणार पशू वैद्यकीय सेवा असा प्रश्न आता घोराड च्या पशू पालकांना पडला आहे. घोराड येथे ले आऊट मधील लाखो रुपयाची ओपन स्पेस ची जागा गत काही वर्षा अगोदर पशू वैद्यकीय दवाखाना व्हावा म्हणून दिली या जागेवर शासनाने लाखो रुपये खर्च करून प्रशस्त इमारत बांधली पण या दवाखान्यात डॉक्टर च राहत नसल्याने पशू पालकांना खाजगी डॉक्टर चा आसरा घ्यावा लागतो . सुरगाव, सेलडोह, घोराड, पवनार, व सेलू अश्या पाच गावांसाठी एकच पशू वैद्यकीय अधिकारी सेवा देत आहे.सेलू हे तालुक्याचे ठिकाण आहे येथे दुपारी , तर सोमवार, बुधवार सुरगाव, मंगळवार घोराड, सेल डोह गुरुवार, पवनार शुक्रवार, असे पाच दिवस आहे.यात पाचही गावे मोठे आहे येथे पशूंची संख्या ही मोठी आहे पण लोकप्रतिनिधी चे याकडे दुर्लक्ष कसे असा प्रश्न निर्माण झाला आहे.

पशू पालकांना जनावरे बिमार झाल्यास खाजगी डॉक्टर कडे धाव घ्यावी लागते तेही वेळेवर येईलच याची शक्यता कमीच असते त्यासाठी जास्त पैसे ही मोजावे लागत आहे याच विभागातील काही पशू वैद्यकीय अधिकारी सेवानिवृत्त झाल्याने ही पदे रिक्त आहे शासनाने नव्याने पद भरती करून पशूंची वैद्यकीय सेवा करण्याची संधी द्यावी अशी मागणी जोर धरत आहे.

राज्य स्तरीय द्वितीय श्रेणी प्राप्त असलेला पशू वैद्यकीय दवाखाना घोराड येथे असला तरी या दवाखान्यात मंगळवार फक्त एकच दिवस पशू वैद्यकीय अधिकारी येत असल्याने पशूंची काळजी कशी घेणार असा प्रश्न निर्माण झाला आहे

## उद्योजकांकरिता १० जुलै रोजी 'इग्नाइट महाराष्ट्र' कार्यशाळा

**गडचिरोली । प्रतिनिधी**

व्यावसायिक व उद्योजक यांच्यामध्ये जागृती निर्माण होण्यासाठी उद्योग संचालनालयामार्फत इग्नाइट महाराष्ट्र २०२४ या कार्यशाळेचे आयोजन बुधवार दिनांक १० जुलै रोजी सकाळी ९.०० ते २.०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन सभागृह येथे करण्यात आले आहे.

सदर कार्यशाळेत जिल्ह्यातील उद्योजकीय कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करुन स्वयंरोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात निर्माण करणे, एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम व निर्यातवृद्धीस चालना देण्यासाठी संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे. तरी या कार्यशाळेचा जिल्ह्यातील उद्योजकांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली यांनी केले आहे.

तरी जिल्ह्यातील सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम, उद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समुह, औद्योगिक वसाहती, शेतकरी व सहकारी संस्था आणि प्रक्रिया उत्पादक इत्यादींनी कार्यशाळेस उपस्थित राहण्याचे आवाहन महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली यांनी केले आहे.



**तळोधी बाळापूर मार्गांवर बर्सिंग गवताच्या कांडीचे बिजाईसाठी छोटे छोटे तुकडे करताना मजूर. बर्सिंग गवतापासून गॅस बनत असल्यामुळे त्याची मागणी खुप वाढत आहे. या गवताला मूल्यही खुप मिळत आहे. छाया :प्रणय बांगरे.**

# राज्याच्या वाळू धोरण समितीमध्ये चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांचा समावेश

### सर्वसमावेश धोरण निश्चित करण्यासाठी समितीचे गठन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यातील नागरिकांना सहज सुलभतेने व माफक दरात वाळू उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सर्वसमावेश धोरण निश्चित करण्यासाठी राज्य स्तरावर समितीचे गठन करण्यात आले आहे. या समितीमध्ये चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली असून याबाबतचा शासन निर्णय ८ जुलै २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. या समितीमध्ये चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांचा समावेश केल्याने प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या अडचणी, जिल्ह्यात वाळू धोरण राबविताना उद्भवणाऱ्या गाव पातळीवरील समस्या व त्याचे निवारण या धोरणात समावेश करणे शक्य होणार आहे.

वाळू उत्खननासाठी निविदा किंवा परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकास कामांकरीता आवश्यक वाळू उपलब्ध व्हावी हा प्रमुख उद्देश आहे. महसूल व वन विभागाच्या १९ एप्रिल २०२३ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील नागरिकांना बांधकाम योग्य वाळू स्वस्त दराने उपलब्ध करून देणे तसेच अनधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर समिती स्थापन करण्यात आली. त्यानुसार वाळूचे उत्खनन, साठवणूक व विक्री व्यवस्थापन करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर १ वर्षासाठी धोरण निश्चित करण्यात आले होते.क्षेत्रीय स्तरावर वाळू धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये येणा-या अडचणी व सदर धोरणामुळे शासनावर पडणारा आर्थिक बोजा या बाबी विचारात घेऊन ना - नफा, ना - तोटा या तत्वावर वाळू उत्खनन, डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मितीसाठी येणारा खर्च, स्वामित्वधनाची रक्कम व इतर शासकीय शुल्क या रकमा विचारात घेऊन वाळू विक्रिची किंमत निश्चित करण्यात आली आली. त्यानुसार १६ फेब्रुवारी २०२४ रोजी सुधारीत वाळू धोरण निर्गमित करण्यात आले आहे.या वाळू धोरणाच्या अंमलबजावणीकरीता येणाऱ्या प्रशासकीय अडचणी, लोकप्रतिनिधींनी वाळू धोरणात सुधारणा करण्याबाबत केलेली विनंती, सर्वसामान्य जनता, घरकुल लाभार्थी तसेच शासकीय कामे व इत्यादींना सहज व सुलभतेने वाळू उपलब्ध व्हावी, अवैध वाळू उत्खननास आळा बसावा, वाळू व्यवसायातील मक्तेदारी व त्यामुळे निर्माण होणारी गुन्हेगारी कमी करणे तसेच वाळूची उपलब्धता, मागणी व पुरवठा यामधील तफावत पाहता कृत्रीम वाळूच्या वापरास (क्रश सँड) प्रोत्साहन मिळेल या दृष्टीने ठोस उपाययोजना करणे, शासकीय अधिकारी ,कर्मचाऱ्यांवरील हल्ले रोखणे एवढेच नव्हे तर पर्यावरण विभागाच्या अटी व शर्तींचे उल्लंघन होणार नाही, याबाबी विचारात घेऊन सर्वसमावेश वाळू धोरण निश्चित करण्यासाठी सदर समितीचे गठन केले आहे.



### अशी आहे राज्यस्तरीय समिती

या समितीचे अध्यक्ष म्हणून नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर सदस्यांमध्ये चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्यासह आयुष प्रसाद (जळगाव), अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी (अहमदनगर), संजय शिंदे (कोल्हापूर), सुनील थोरवे (रायगड), घनश्याम भुगांवकर (गोंदिया), अजय मोरे (पुणे), डॉ. अरविंद लोखंडे (छ. संभाजीनगर), नागपूरचे जिल्हा खनिकर्म अधिकारी अतुल दौंड, शिरीष नाईक (यवतमाळ), दीपक चव्हाण (नंदूरबार), अमोल थोरात (सातारा), विवेक घुले (ठाणे) यांचा समावेश असून समितीचे सदस्य सचिव म्हणून नाशिक विभागाच्या उपायुक्त (महसूल) मंजिरी मनोलकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## थोडक्यात

### मुंबईत विक्रमी पाऊस, पण निचरा वेगाने

**मुंबई**–मुंबईत विक्रमी पाऊस पडल्याने पाणी साचले आहे. लष्कर, नौदल, हवाई दलाला अलर्ट केले आहे. ६० पंपिंग स्टेशन सुरू झाल्यावर अशी परिस्थिती निर्माण होणार नाही. तरीही पाण्याचा निचरा वेगाने होत आहे. सर्व यंत्रणा मिळून काम करत आहोत. मला राजकारण करायचे नाही, सध्या लोकांना मदत करायची आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.मुंबईत मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे मुंबईतील जनजीवन विस्कळीत झालेले आहे. दरम्यान, या सर्व प्रकारानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन मुंबईकरांना शक्यतो घराबाहेर पडू नये, अशी विनंती केली आहे. तसेच पावसाच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी प्रशासनाकडून काय उपाययोजना केल्या आहेत, व कशाप्रकारे कंट्रोल रुम काम करत असल्याची माहिती देखील त्यांनी दिली.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मुंबईत २६७ ते ३०० मिमी पाऊस पडला आहे. ६५ मिमी पेक्षा जास्त पाऊस झाल्यावर अतिवृष्टी समजली जाते. त्यामुळे रेल्वे ट्रॅकवर पाणी साचले आहे. चुनाभट्टी आणि सायन येथे पाणी भरले आहे. दुसरीकडे रेल्वेचे २०० आणि इचउ चे ४८१ पंप चालू आहेत. मिलन सब वे मध्ये पाणी साचले नाही कारण तिथे पंप काम करत आहेत. होल्डिंग पॉईंट आणि मायक्रो टनेलिंगमुळे पाणी साचण्याचे प्रमाण कमी झाले आहे. रेल्वे प्रशासनाशी सकाळपासून संपर्कात असून कोणत्या लोकल थांबल्या आहेत आणि कोणत्या सुरू आहेत याची माहिती घेतली आहे. आता लोकल सेवा पुन्हा सुरू झाल्या असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सिरीयस माणूस नाही

**मुंबई**–महाराष्ट्रातील मुख्यमंत्री सिरीअस माणूस नाही, कट करणं त्यांच्यासाठी गौरव, अभिमान आहे अशी बोचरी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. तसेच त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. ज्यांनी खोटं बोलून सत्ता घेतली तो खोटे नॅरेटिव्हबद्दल बोलत असेल तर काय? असे ते म्हणाले.मुंबईतील वरळीमध्ये हिट अँड रनची घटना घडली आहे. यावरून पटोले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली आहे. ''महाराष्ट्राच्या विकासाची गती थांबवण्यासारखा या घटना आहेत. या सरकारला सत्तेचा माज आला आहे. मुख्यमंत्र्यांनी सांगितलं होतं आम्ही त्यांना पाठीशी घालणार नाही. मात्र, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री सिरीयस माणूस अजिबात नाही. आपली खुर्ची वाचवणे, भ्रष्टाचार आणि कटकारस्थान निर्माण करणे हे त्यांच्यासाठी गौरव आणि अभिमानाचा'' असल्याची बोचरी पटोले यांनी केली.तसेच यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली आहे. फडणवीस स्वतः बद्दल नॅरेटिव्ह तयार करतात. ज्यांनी खोटं बोलून सत्ता घेतली तो खोटे नॅरेटिव्हबद्दल बोलत असेल तर काय? फडणवीस आणि नितीन गडकरी यांनी खोटं नॅरेटिव्ह पसरवलं. फडणवीसच याचे मास्टरमाईंड आहेत. विधानपरिषद निवडणुकीत चुकीचा नॅरेटिव्ह पसरवले जात आहे, आमचे तिन्ही उमेदवार निवडून येतील'', असा हल्ला पटोले यांनी चढवला आहे.

### किल्ले रायगडावर ढगफुटी सदृश्य पाऊस


**पुणे**–राज्यातील मुंबईत सध्या पावसाचा हाहाकार सुरू आहे. तसेच कोकणातही पावसाची दमदार बॅटिंग सुरू आहे. किल्ले रायगडावर ढगफुटी सदृश्य पाऊस सुरू आहे. धडकी भरवणारे पावसाचे व्हिडिओ देखील समोर आला आहे. या पावसात अनेक पर्यटक अडकून बसल्याची देखील भीती आहे. या सर्व परिस्थितीवरून रायगड किल्ला ८ जुलैपासून पर्यटनासाठी बंद करण्यात आला आहे.सध्या राज्यभरात सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहत आहेत. किल्ले रायगडावर रविवारी संध्याकाळी ढगफुटीसदृश्य पाऊस झाला झालाय. यामुळे रायगडाच्या पायरी मार्गाला ओढ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते.

# राष्ट्रीय पुनर्निर्माण, सक्षम व सशक्त तरुण पिढीचे उदात्त ध्येय!

**अखिल भारतीय विद्यार्थी परिषद– एबीव्हीपी ही एक राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना आहे, ही संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांशी साम्य असलेली संघटना आहे. तीस लाख वीस हजाराहून जास्त सदस्य असलेली ही जगातील मोठी विद्यार्थी संघटना आहे. अ.भा.वि.प. ही उजव्या विचारश्रेणीची भारतीय विद्यार्थी संघटना असून ती रा.स्वं.संघाशी जोडलेली आहे. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात विद्यार्थी हितासाठी काम करणारी संघटना आहे. श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींची ही सुंदर रोचक संकलित माहिती सदर लेखातून वाचकसेवेत समर्पित... संपादक.**

भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रीय पुनर्निर्माण, सक्षम आणि सशक्त तरुण पिढी घडवण्याच्या उदात्त ध्येयाने दि.९ जुलै १९४९ रोजी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा प्रवास सुरू झाला. कोणत्याही संघटनेसाठी ७५व्या वर्षापर्यंत पोहोचणे ही एक अभिमानास्पद, महत्त्वाची आणि उत्सवाची घटना होय. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या संघटनात्मक प्रवासात ही घटना अशा वेळी आली आहे, जेव्हा देशाच्या स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी पर्व सुरू आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा हा प्रवास देशाच्या विकासासोबतच देशासाठी समर्पित सक्षम तरुण पिढी घडवण्याचा आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे स्वरूप ७५व्या वर्षात व्यापक आणि बहुआयामी झाले. मागील वर्षी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची एकूण सदस्यता ४५ लाखांहून अधिक झाली असून, देशभरात २१ हजारांहून अधिक ठिकाणी अभाविपच्या शाखा व संपर्क केंद्र आहेत. हा केवळ आकडा नसून, विद्यार्थी परिषदेचे अखिल भारतीय चारित्र्य स्पष्टपणे समोर आणून ती जागतिक स्तरावरील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना असल्याचे सिद्ध करते. गेली ७४ वर्षे शिक्षण क्षेत्रातील विविध विषयांवर कार्यरत असलेल्या अभाविपच्या सकारात्मक शक्तीने भारतीय शैक्षणिक परिसरांमधून राजकारण, चित्रपट, मीडिया, व्यवसाय, शिक्षण, प्रशासन आदी क्षेत्रांना प्रभावी युवा नेतृत्व दिले आहे. आज या वैविध्यपूर्ण क्षेत्रातील अनेक नामवंत व्यक्ती आहेत, जे विद्यार्थी जीवनात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी सक्रियपणे जोडलेले आहेत.

देशातील आणीबाणीसारख्या मोठ्या संकटाविरुद्ध अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची महत्त्वाची भूमिका आणि योगदानासोबतच लहान–मोठ्या प्रमाणात अशी अनेक उदाहरणे आहेत, जेव्हा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या नेतृत्वाखाली देशातील तरुणांनी सकारात्मक बदल घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अभाविपचे राष्ट्रीय संघटनमंत्री राहिलेले आणि सध्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.**

प्रमुख असलेले सुनील आंबेकर अभाविपच्या संकल्पानिमित्त लिहितात की, भारत ही आमची माता आहे, आम्ही पुत्राप्रमाणे देशवासीयांची सेवा करू, या संकल्पासोबत विद्यार्थी परिषदेची स्थापना झाली होती. विद्यार्थी परिषदेचे कार्यक्षेत्र जरी शैक्षणिक परिसर म्हणजेच कॅम्पस असले, तरी वैचारिक क्षेत्र हे शिक्षणाच्या पलीकडे जाऊन देशहिताच्या प्रत्येक मुद्द्याशी निगडित आहे.

अगदी सन १९६१ सालपासून हजारो शिक्षण संस्थेमध्ये अभाविपच्या अनेक शाखांचा सक्रिय सहभाग असल्याचे दिसते. सन १९७०नंतर अभाविपने मोठ्याप्रमाणावर मध्यमवर्गाचे प्रश्न हाताळायला सुरुवात केली, जे इतर डाव्या पक्षांकडुन हाताळले जात होते आणि त्यामध्ये




तत्कालिन सरकारची भ्रष्टाचाराबाबतची अनास्था आणि इतर मुद्यांचा सहभाग होता. जेपी.चळवळीमध्ये आणि त्याभोवतालच्या अनेक निदर्शनांमध्ये अभाविपचा सक्रिय सहभाग होता, त्यांनी त्यासाठी गुजराथ आणि बिहारमधील विद्यार्थी संघटनांबरोबर हातमिळवणी केली होती, आणिबाणीनंतर याच सगळ्या कामांमुळे अभाविपच्या सदस्य संख्येमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून आले. सन १९७४नंतर अभाविपच्या सदस्य संख्येमध्ये मोठ्याप्रमाणात वाढ झाली आणि ती १६०,०००च्या वर पोहोचली शिवाय त्यांनी ७९० ठिकाणी आपल्या शाखासुद्धा सुरू केल्या, भारतभरातील अनेक विद्यापिठांमध्ये प्रभावी अस्तित्व निर्माण केले. हीच संख्या १९८३ दरम्यान २५०,०००च्या वर गेली आणि ११००च्यावर शाखा भारतभर उघडल्या गेल्या. सन १९९०च्या बाबरी मशिदीच्या घटनेमुळे आणि नरसिंहराव सरकारने मुक्त बाजाराचे धोरण स्वीकारल्यामुळे मोठ्याप्रमाणावर अभाविप वाढली आणि आता सन २०१६ला त्यांची सदस्य संख्या ३.१७८ लाखाच्या वर पोहोचलेली आहे. त्यामुळे ही संघटना भारतातील सगळ्यात मोठी विद्यार्थी संघटना आहे.

**दिन विशेष**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा प्रवास हा भारतीय मूल्यांनी प्रेरित देशभक्त तरुणांची सक्षम पिढी घडवण्याचा प्रवास राहिला आहे. कोरोना महामारीच्या काळात, देशावर संकट आले असताना, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या नेतृत्वाखाली अनेक तरुणांनी लोकांचे दुःख कमी करण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले. हे ताजे उदाहरण आहे, असे अनेक प्रसंग आले आहेत, जेव्हा अभाविपच्या नेतृत्वाखाली तरुणांनी एकत्र येऊन देशातील विविध समस्या सोडवण्यासाठी सर्वप्रथम पुढे आला. देशातील शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सध्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाची हितचिंतक म्हणून आपली भूमिका बजावत आहे. आज अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विविध शाखा पर्यावरण, सेवा, क्रीडा इत्यादी क्षेत्रातही कार्यरतअभाविपच्या सदस्य संख्येमध्ये मोठी वाढ आहेत.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने आपला प्रवास सतत नवनवीन विषय आणि क्षेत्रांशी जोडून ठेवला आहे, त्यामुळेच ७५व्या वर्षात पोहोचलेला हा प्रवास कुठेही खडतर किंवा स्तब्ध न राहता सतत गतिमान आणि नव्या क्षेत्रांमध्ये गुंतलेला दिसतो. एकीकडे उर्वरित विद्यार्थी संघटना मर्यादित क्षेत्रात एकाकी आंदोलनापुरत्या मर्यादित असताना, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा प्रवास केवळ आंदोलनांपुरता मर्यादित न राहता, शिस्तबद्ध सर्जनशीलतेच्या माध्यमातून तरुणांना जगाशी संबंधित विविध विषयांशी जोडणारा आणि भारतीय मूल्यांशी जोडून सतत गतिमान राहणे व अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणादायी आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा शिस्तबद्ध, भारतीय–केंद्रित विचार मार्गावर गतिमानतेचा प्रवास असाच प्रवाहित राहील, जेणेकरून येणार्या पिढ्यांना नवीन आव्हानांना तोंड देता येईल आणि राष्ट्र पुनर्निर्माणाचे स्वप्न पूर्ण करता येईल व सक्षम नागरिक म्हणून भारतीय तरुण प्रत्येक क्षेत्रात जागतिक नेतृत्वाची भूमिका बजावू शकतील.

!! सर्व देशवासीयांना अखिल भारतीय विद्यार्थी परिषद स्थापना व राष्ट्रीय विद्यार्थी दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

## घोराड येथे पीक विमा शिबिर



**सेलू । प्रतिनिधी**

खरीप हंगामात शेतात पेरणी केलेल्या पिकाचा पीक विमा काढण्यासाठी सुलभ जावे म्हणून घोराड येथे पीक विमा शिबिर घेण्यात आले या शिबिराला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिराचे आयोजन किसान अधिकार अभियान व कृषी विभाग यांनी केले होते .यावेळी तालुका कृषी अधिकारी रविंद्र राऊत, मंडळ कृषी अधिकारी विजय नांदे, कृषी सहाय्यक सुशील महाकाळकर, किसान अधिकार अभियान चे सुदाम पवार, विठ्ठल झाडे, शेतकरी विलास चांदनखेडे, राजेंद्र वरटकर , आदी शेतकरी उपस्थित होते हे शिबिर ग्राम पंचायत कार्यालयात घेण्यात आले यावेळी श्री अन्नाची पौष्टिक तृण धान्याची ओळख या पुस्तकाचे प्रकाशन करून शेतकऱ्यांना विनामूल्य हे पुस्तक कृषी विभाग कडून देण्यात आले .

## आषाढी एकादशी निमित्त कीर्तन व पालखी सोहळ्याचे आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**

येथील विठ्ठल मंदिर देवस्थान मध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षी आषाढी एकादशी निमित्त गुरुवार दि. ११ ते १८ जुलै दरम्यान हरिनाम सप्ताह , कीर्तन आणि पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

वरोरा येथील विठ्ठल मंदिर देवस्थान मध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षी आषाढी एकादशीचे औचित्य साधून गुरुवार दि.११ जुलै ते १८ जुलै पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.सदर हरिनाम सप्ताह दरम्यान गुरुवार दि.११ जुलै रोजी सकाळी सहा वाजता श्रींच्या मूर्तीची स्थापना केली जाणार आहे. त्यानंतर नरेंद्र गोविंदराव डोंगरवार यांच्या हस्ते श्रींची महापूजा आयोजित करण्यात आली आहे. ही पूजा सप्ताह दरम्यान दररोज सकाळी ६ वाजता होणार आहे. तसेच दररोज सकाळी ९:३० ते सायंकाळी ६:३० या वेळेत श्री मोठे विठ्ठल मंदिर भजन मंडळ यांचे हस्ते भजन व आरती होणार आहे. शनिवार दि.१३ जुलै रोजी सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत ह. भ. प. मनू महाराज तुगनायत व संच वणी यांच्या संगीतमय सुंदर कांड पाठाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते १६ जुलै दरम्यान दुपारी दररोज तीन ते साडेपाच वाजेपर्यंत प्रो. राम काळे महाराज वर्धा यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. एकादशीला सदर कीर्तन रात्री८ ते १०:३० या वेळेत होणार आहे. दि.१७ जुलै रोजी एकादशीच्या पर्वावर संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु श्री तुकाराम महाराज यांची विठ्ठल–रुक्मिणी भेट सकाळी १०:३० वाजता घडवली जाणार आहे. गुरुवार दि.१८ जुलै रोजी दुपारी२:३० पालखी सोहळा व गोपाळकाला आयोजित करण्यात आला आहे. यात श्री चा प्राचीन रथ व माऊली आणि जगद्गुरूंची पालखी यांची भजनी दिंड्यांसह भव्य शोभायात्रा श्री मोठी विठ्ठल मंदिर देवस्थान मधून काढली जाणार असून ती मुख्य बाजारातील प्रमुख रस्त्यांवरून फिरवली जाणार आहे. तसेच शनिवार दि.२० जुलै रोजी दुपारी २ ते ५ वाजे दरम्यान मोठे श्री मोठे विठ्ठल मंदिर देवस्थान येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमाचा लाभ भावक भक्तांनी घ्यावा असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.



## ध्येयप्राप्तीसाठी परिश्रमाचा निर्धार करा;ना.सुधीर मुनगंटीवार यांचे गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

### मुल येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**मुल । प्रतिनिधी**

विद्यार्थी देशाचे भविष्य आहेत. आजचे यश हे उद्याच्या उज्ज्वल भवितव्याकडे वाटचाल करणारे महत्वाचे पाऊल आहे. मुल तालुक्यातील विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर आकाशामध्ये यशाची उंच भरारी घेण्याची कामगिरी केली आहे. मुल तालुक्याचा गौरव महाराष्ट्रभर, देशामध्ये सुगंध पोहोचेल, असे कार्य करा, अशा शुभेच्छा देताना राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांना ध्येयप्राप्तीसाठी परिश्रमाचा निर्धार करा, असा संदेश दिला.

मुल येथे आयोजित करिअर व व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन तथा गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला सोपान कनेरकर, भारतीय जनता पार्टीचे महामंत्री डॉ. मंगेश गुलवाडे, राजेंद्र महाडोळ, माजी नगराध्यक्ष रत्नमाला भोयर, नंदकिशोर रणदिवे, प्रभाकर भोयर, चंदू मारगोनवार, अजय गोगुलवार,अनिल सावरकर, महेंद्र करकाडे, किशोर कापगते, सोहम बुटले, माजी नगराध्यक्ष उषाताई शेंडे, प्रवीण मोहुर्ले, सुखदेव चौथाले यांच्यासह पुरस्कारप्राप्त विद्यार्थी, पालक, शिक्षक आदी मोठ्या संख्येत उपस्थित होते. यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले. पुढील वाटचाल ठरवितांना आणि लक्ष्य निर्धारित करताना त्याचा निर्धार परिश्रमातून करा. परिश्रमातून केलेला निर्धार हा यशाची वाट स्पष्ट आणि सोपी करतो, असा संदेशही त्यांनी यावेळी दिला. विद्यार्थ्यांनी मोबाईल, इंटरनेटचा वापर हा अभ्यासाठी आणि आवश्यकते पुरताच करावा, असेही त्यांनी नमूद केले. आई–वडीलांना दुखवून कुठलेही यश मिळविता येत नाही. त्यामुळे आई–वडिलांचा आदर राखा. वाईट संगतीपासून दूर रहा, असाही संदेश ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिला.

ना.मुनगंटीवार यांनी राज्य शासनाकडून सुरू करण्यात आलेल्या शैक्षणिक योजनांबद्दल माहीती दिली. मुलींना उच्च शिक्षणात जातपात, उत्पन्न आडवे येऊ नये यासाठी शासनाकडून मुलींच्या व्यावसायिक उच्च शिक्षणाची शंभर टक्के शुल्क माफी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. बल्लारपूर येथे साकारण्यात येत असलेल्या मेडिकल कॉलेजमध्ये मुलींसाठी वस्तीगृहांची संख्या अधिक असल्याचेही त्यांनी सांगितले. पुस्तकातील ज्ञानासोबतच व्यावहारीक ज्ञान देखील आवश्यक आहे. यासाठी सरकारकडून सहा महिने १० हजार रुपये सन्मान निधी योजना सुरू करण्यात आली असल्याचेही ना. सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. बल्लारपूर येथे मुलींसाठी एसएनडीटी विद्यापीठ सुरू झालेले आहे. पुढे या विद्यापीठात ६२ व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करणार आहोत. सर्वात जास्त अभ्यासक्रम या उपकेंद्रात राहतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. बाबूपेठ येथे गोंडवाना विद्यापीठाचे उपकेंद्रामध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मोरवा एअरपोर्टमध्ये दोन फ्लाईंग क्लब लवकरच सुरू होत आहेत. आपल्या भागातील भगिनी आणि बांधवांना सुद्धा आकाशात उंच भरारी घेता यावी, यासाठी ही सुरूवात आहे. कमर्शिअल पायलट ट्रेनिंगसाठी एकूण ५० लक्ष रुपये लागतात. मात्र प्रतिभावंत गोरगरीब विद्यार्थी केवळ पैशाअभावी या शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी ४८ लक्ष रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे आपल्या भागातील विद्यार्थ्यांचे पायलट होण्याचे स्वप्न साकार होणार आहे, अशी माहिती देखील ना.सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

## नीलेश लंकेंचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच मुक्काम

### सलग दुसऱ्या दिवशी आंदोलन सुरू

**अहमदनगर**–शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडीच्या वतीने अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येत आहे. सलग दुसऱ्या दिवशी देखील हे आंदोलन सुरू आहे. दुधाला आणि कांद्याला योग्य भाव मिळावा, अशी मागणी या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. कालपासून या आंदोलनाला सुरूवात झाली असून खासदार नीलेश लंके यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच मुक्काम ठोकला. मात्र, अद्याप प्रशासनाच्या वतीने या आंदोलनाची दखल घेण्यात आलेली नाही.



नीलेश लंके यांनी खासदार झाल्यानंतर केलेले हे पहिलेच आंदोलन असून कांद्याच्या माळा गळ्यात घालून त्यांनी आंदोलनाला सुरूवात केली आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात शेतकरी देखील जोडले गेले आहेत. इतकेच नाही तर जो पर्यंत मागण्या मान्य होत नाही तो पर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा देखील खासदार नीलेश लंके यांनी दिला आहे. या आंदोलनात ५०० ते १००० गायी आणि शेळ्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घेऊन येणार असल्याचा इशारा देखील खासदार नीलेश लंके यांनी दिला आहे. तसेच आपण जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झोपड्या टाकू, असेही त्यांनी म्हटले आहे.आंदोलकांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील कांदा व दूध उत्पादक शेतकरी योग्य भाव न मिळाल्यामुळे आर्थिक संकटात सापडला आहे. दूधाचे भाव गेले वर्षभर सातत्याने कोसळत आहेत. दुधाला किमान ४० रुपये भाव देण्याची मागणी शेतकरी गेल्या अनेक दिवसांपासून करत आहेत. दूधाला मिळणाऱ्या सध्या भावामध्ये दूध उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही त्यातून निघत नाही. यामुळे राज्यातील शेतकरी मेटाकुटीला आलेले आहेत.

सरकारने दुधाला अनुदान देण्याची घोषणा केली. पण अनुदानासाठीच्या जाचक अटी व शर्तीमुळे शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नाही. केंद्र सरकारने नुकताच १० हजार टन दूध पावडर आयात करण्याचा निर्णय घेतलवा. ही आयात करमुक्त असल्यामुळे दूध उत्पादकांना त्याचा मोठा फटका बसणार आहे, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.केंद्र व राज्य सरकारच्या धोरणामुळे शेती तोट्यात जात आहे. वाढती महागाई, नैसर्गिक आपत्ती, खतांचे वाढलेले दर, सरकारचे शेतीमालाच्या चुकीचे आयात–निर्यात धोरण, रासायनिक खते, बी–वियाणे, किटकनाशके, शेती औजारे याच्या माध्यमातून जीएसटीचे शेतकऱ्यांवर मोठा ओझे पडले आहे. यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. देशातील उद्योगपतींचे अब्जावधींचे कर्ज माफ केले जाते. मात्र, देशभरातील जनतेला अन्नधान्य पुरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर सरकारला दिसत नाही. यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी सरकारने संपूर्ण कर्जमाफीसह तात्काळ विविध उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे आंदोलकांनी म्हटले आहे. दरम्यान, आंदोलकांनी शेतकऱ्यांच्या दूधाला प्रतिलीटर ४० रुपये दर देण्याची मागणी केली आहे.

# 'मिशन पुना आकी' संपन्न ;जन्म दाखला आधार कार्ड कॅम्पचा अनेकांना लाभ



ही मोहीम जरी पार पडली असली तरी उर्वरित लाभार्थ्यांना देखील लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. लाभार्थ्यांचे जुने हस्तलिखित जन्मदाखले जमा केलेले असून ऑनलाइन करून दिले जात आहेत. जन्म नोंद नसलेल्या लाभार्थ्यांना जन्म दाखले या महिन्यात मिळवून देण्यासाठी मिशन मोडवर काम चालू आहे.
– स्वप्निल मगदूम, गटविकास अधिकारी भामरागड



**गडचिरोली I प्रतिनिधी**

पंचायत समिती भामरागड तर्फे आकांक्षीत तालुका कार्यक्रम अंतर्गत 'मिशन पुना आकी' म्हणजेच 'मिशन नवी सुरवात' ही मोहीम नुकतीच पार पडली. या मोहिमेअंतर्गत भामरागड तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये जून महिन्यात एक दिवसीय शिबिराच्या आयोजनातून आधार कार्ड, जन्म दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, बँक अकाऊंट अशी महत्वाची कागदपत्रे ग्रामस्थांना गावातच उपलब्ध करून दिली गेली. तसेच महत्वपूर्ण योजनांचा लाभ व माडिया भाषेतून पथनाट्य सादर करीत महिला आरोग्य व अधिकार यावर प्रबोधन केले गेले.

भामरागड मधील बहुतांश लोकांच्या आधार व जन्म दाखल्याच्या समस्या असल्याने विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांना अडचणी येतात. ही कागदपत्रे मिळवण्यासाठी तालुक्याच्या फेऱ्या मारणे शक्य नसल्याने लोक टाळाटाळ करतात. परिणामी बरेच लाभार्थी शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. तसेच भामरागड तालुक्यातील महिला आरोग्याशी संबंधित मासिक पाळी स्वच्छता, कुमारी माता/बालविवाह व संस्थात्मक प्रसूती हे विषय देखील गंभीर आहेत. या समस्या ओळखून पंचायत समिती भामरागड तर्फे ही मोहीम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांच्या मार्गदर्शनात व गटविकास अधिकारी स्वप्नील मगदूम यांच्या नेतृत्वाखाली पार पाडली ग

. मिशन पुना आकी' ही मोहीम २ जून ते २९ जून दरम्यान धोडराज, मल्लमपोडूर, विसामुंडी, बिनागुंडा, नेलगुंडा, गोंगवाडा, हालोदंडी, कोठी, होड्री, लाहेरी, येचली, मन्नेराजाराम, मडवेली, जिंजगाव, इरकडुम्मे, नारगुंडा, टेकला व आरेवाडा या गावांमध्ये पार पडली. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी पंचायत समिती व ग्रामपंचायतचे कर्मचारी, सरपंच, ग्रामसेवक, आकांक्षीत तालुका फेलो, आरोग्य तपासणी पथक, रोजगार सेवक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, मोबिलायझर व पथनाट्यातील कलाकार या सर्वांनी महत्वाची कामगिरी बजावली.

### मोहीमेची उपलब्धी

मोहिमेदरम्यान जन्म नोंदणी उपलब्ध नसलेले एकूण २८२० दाखले दिले. फिरत्या आरोग्य तपासणी पथकाने १९९८ जणांची तपासणी केली. यावेळी गर्भवतींचे व लहान बालकांचे लसीकरण देखील केले गेले. माता व बालकांसाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या बालसंगोपन, जननी सुरक्षा व प्रधानमंत्री मातृत्ववंदना योजनांची माहिती देत आशा वर्कर व अंगणवाडी सेविका यांच्या मदतीने कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली. आधार कार्ड संबंधित लाभ १५८९ लाभार्थ्यांनी घेतला. यापैकी ३११ नवीन आधार कार्ड काढणारे लाभार्थी होते. इंडियन पोस्ट बँक व महाराष्ट्र बँकेचे २०१ जणांनी अकाऊंट काढले. ग्रामसेवकांकडून विवाह नोंद प्रमाणपत्र दिले गेले. काही शिबीरात बँकेकडून अपघाती विमा, पिक विमा, पॅन कार्ड, आभा व आयुष्यमान कार्ड यावेळी काढून देण्यात आले.

### महिलांच्या अधिकारासाठी 'आस्कना अधिकार, विजय किकाल!' या पथनाट्याचे सादरीकरण

यावेळी भामरागड मधील तरुण कलाकारांनी माडिया भाषेतून महिला आरोग्य व अधिकारांविषयी पथनाट्य सादर केले. मासिक पाळी स्वच्छता याविषयी माहितीच्या अभाव व पाळीतील महिलांना अनेक नियम पाळावे लागत असल्याने त्याचा थेट प्रभाव महिलेच्या आरोग्यावर होतो. कुमारी माता/ बालविवाहाच्या समस्येमुळे कुपोषित मुले, माता मृत्यू या अडचणींसोबत विविध योजनांचा लाभ त्यांना मिळू शकत नाही. संस्थात्मक प्रसूती देखील यासाठी महत्त्वाची आहे. शिवाय नवजात बालकासोबत आईला घराबाजूच्या चाप्यात कमी सुविधांमध्ये आठवडाभर राहावं लागत असल्याने दोघांच्याही आरोग्याला धोका निर्माण होतो. या सर्व महत्त्वाच्या व गंभीर मुद्द्यांवर या पथनाट्यातून जनजागृती करण्याचे काम कलाकार करीत आहेत.

# पहिल्याच पावसात नाल्याचे पाणी शिरले घरात



**पुलगाव I प्रतिनिधी**

पुलगाव येथे दि. ७ जुलै ला दुपारी ४ च्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसाने शहरातील बरांडा भागातील नाल्याला आलेल्या पुराचे पाणी घरांमध्ये शिरले. त्यामुळे तेथील घरांचे मोठे नुकसान झाले.

सदर नाला टेलिफोन एक्सचेंज जवळ असल्याचे सांगण्यात आले आहे. नगर परिषदेने अनुभव नसलेल्या ठेकेदारांना नाला खोलीकरण व बांधकाम यासंबंधी काम दिले. त्यांनी नाल्याचे खोदकाम न करता बांधकाम केले.नाल्याचे बांधकाम करताना त्याचे खोलीकरण करून नंतर बांधकाम केले असते तर ही परिस्थिती निर्माण झाली नसती.निकृष्ठ बांधकामामुळे नाल्याच्या पुराचे पाणी घरांमध्ये शिरत आहे,असा आरोप शिवसेना जिल्हा प्रमुख आशिष पांडे, विशाल चौधरी, नितीन तुरक यांनी केला असून ठेकेदारावर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.ज्यांचे घरात पाण्यामुळे नुकसान झाले आहे. त्यांची नुकसान भरपाई ठेकेदाराने भरून द्यावी,अशी मागणी करण्यात आली आहे.रात्री असाच मुसळधार पाऊस झाला तर मोठ्या प्रमाणात या भागात पाणी शिरेल व मोठी हानी होण्याची शक्यता आहे. पावसाळ्यापूर्वी नाल्याची साफसफाई केली की नाही? याबाबत नागरिकामध्ये उलट सुलट चर्चा सुरू आहे. सध्या प्रशासक राज सुरू आहे.मुख्याधिकारी यांनी चौकशी करून कारवाई करावी,अशी शिवसेनेने मागणी केली आहे.

# घरकुलाच्या मागणी साठी रिपाई चे हल्ला बोल आंदोलन

**धामणगाव रेल्वे I प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) धामणगाव रेल्वे शहर कार्यकारिणी च्या वतीने दलित, वंचित, मुस्लिम समाजातील बेघर धारकांना व ज्यांच्याकडे ८ अ नाही.अशा नगर परिषद हद्दीतील लोकांना जे ५० ते ८० वर्षा पासून राहतं आहे. त्यांना कोणतीही घरकुल योजना मिळाली नाही. ती रमाई घरकुल योजना असो किंवा पंतप्रधान आवास योजना असो. अशा बेघर धारकांना घरकुल योजना मिळावी या मागणीला घेवून हल्ला बोल आंदोलन करण्यात आले.

या मागणीचे निवेदन धामणगाव रेल्वे नगर परिषद चे मुख्याधिकारी व आमदार प्रतापदादा अडसड यांच्या प्रतिनिधी म्हणून प्रतिनिधी म्हणून भाजपा धामणगाव रेल्वे विधानसभा प्रमुख रावसाहेब रोठे यांना निवेदन देण्यात आले.



निवेदन देताना प्रशांत मुन अमरावती जिल्हा मुख्य सघंटक यांच्या सह धिरज भैसारे युवक आघाडीचे अध्यक्ष ,राजिक बेग अध्यक्ष अल्पसंख्याक . रवि उर्फ दादू मेश्राम,डॉ पवन झटाले, मनिष शेलारे,राजेंद्र सावध,प्रविण भैसारे , स्नेहल वानखडे ,माधवि सावध,शेख महेबुब,शेख जाकिर महेमुद खान , सदानंद कांबळे,रिहाना बानो,हामीदा बिन,प्रकाश भैसारे, आदित्य शंभरकर,रेखा डोळस ,रमेश पाटील,लखन परिहार तथा असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते .

# अभाविप व्यक्ती निर्माणाची संस्कार शाळा–नुरसिंग जाधव

**पुलगाव I प्रतिनिधी**

अभाविप ही व्यक्ती निर्माणाची संस्कार शाळा असुन विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून देशाला कर्तृत्ववान कार्यकर्त्यांची पिढी सतत मिळत असते.राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात नेतृत्व करणारे अनेक व्यक्तिमत्व विद्यार्थी परिषदेत घडलेले आहे. विद्यार्थ्यांनी या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे प्रतिपादन आर. के. हायस्कुलचे समन्वयक नुरसिंग जाधव यांनी केले. स्थानिय हेडगेवार नागरी पतसंस्था येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद शाखा पुलगावच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व नवनिर्वाचित कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

या कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष आर के हायस्कूलचे समन्वयक नुरसिंग जाधव , कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते वर्धा नागरी सहकारी बँकेचे संचालक हितेश पैकीने , अ.भा.वि.प. पुलगावच्या अध्यक्ष रसिका ओक , उपाध्यक्ष देवेंद्र सोनटक्के व विशेष पाहुणे म्हणून सी. आर. पी. एफ. ची एअर कमांडंट परिक्षा देशातून १४ व्या रँक ने उत्तीर्ण प्रसाद अरक , जिल्हा संयोजक अर्पित तिवारी,पुलगाव नगर मंत्री अनिश यादव यांच्या उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अतिथींचा परिचय सौ.रसिका ओक यांनी करून दिला. निर्वाचन अधिकारी सागर पेरके यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीची घोषणा केली. हितेश पैकीने , प्रसाद अरक यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना मौलिक मार्गदर्शन



केले व दहावी,बारावी, जे.इ.इ, नीट,विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन संकेत बाभळे यांनी केले तर आभार प्रदर्शन अनिश यादव यांनी केले. यावेळी घोषित नगर कार्यकारणी घोषित करण्यात आली ज्यात अध्यक्ष म्हणून रसिका ओक, उपाध्यक्ष देवेंद्र सोनटक्के ,नगरमंत्री अनीश यादव,सहमंत्री शुभम ढोक,सहमंत्री राम चांडक,सहमंत्री आयुष येंडे,सहमंत्री भूमिका बढिए,कार्यालयिन मंत्री सायली देशमुख,सहमंत्री जयेश राठी,सहमंत्री आदित्य आकड़े,एस एफ डी प्रमुख:- लक्ष चौधरी,सहप्रमुख जयेश तिरळे,सहप्रमुख सुजल सतीजा, एस एफ एस प्रमुख तन्मयी पैकिने,सहप्रमुख ओम सतपाल,राष्ट्रीय कलामंच प्रमुख प्रियंका परिहार,सहप्रमुख पुर्वा सावरकर,स्कूली कार्यप्रमुख ऋजुता देशमुख,सहप्रमुखबवीर काळे, टीएसवीके प्रमुख आदित्य दुबे,सहप्रमुख श्रेयष पाठक,सोशल मीडिया आयुष तीखे सहप्रमुख राज चांडक,आंदोलन प्रमुख प्रथमेश तिवारी,सहप्रमुख इशिता बढिए,स्वाध्याय मंडळ अश्लेषा सुरसे,सहप्रमुख ओम सतपाल,कोष प्रमुख जय कादी,सहप्रमुख दर्शन गाडगे,वस्तिगृह प्रमुख अनुज तिवारी,सहप्रमुख श्रावणी राजगुरे,फार्मविजन प्रमुख कल्याणी मिर्जामले,सदस्य संकेत बाभळे,रामानंद देशमुख,क्षितिज केशरवानी, साक्षी पांडे, दुशान्त मंडले, अर्पित तिवारी.कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता सर्व कार्यकारणी सदस्यांनी, कार्यकर्त्यांनी व सर्वांनी विशेष सहकार्य केले.

# सिंगल फेज लाईन करिता निवेदन



**वर्धा I प्रतिनिधी**

वर्धा शहरालगत असलेले झाडगाव (गो) येथील शेतकरी कित्येक दिवसापासून विद्युत महामंडळ महाराष्ट्र राज्य यांना सिंगल फेस बाबत वारंवार निवेदन देऊन सुद्धा त्यावर दिरंगाई होत असल्यामुळे झाडगाव गावातील शेतकऱ्यांनी विद्युत महामंडळातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली व त्यांना आपल्या अडचणी समजून सांगितल्या.

या सिंगल फेस विद्युत प्रवाहामुळे संपूर्ण गावातील शेतकरी रात्रीच्या वेळेस आपल्या पिकाचं रक्षण करू शकणार आणि शेतीतील जोडधंदा दुग्ध व्यवसायाला सुद्धा चालना मिळणार.या बाबत अधिकाऱ्यांशी चर्चा झाली.यावेळी अधिकाऱ्याने शेतकऱ्यांना सांगितले की सिंगल फेजचे काम झालेले आहे. काही दिवसातच पुर्णवेळ सिंगल फेज लाईन मिळेल.यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला . यावेळी निवेदन देतांना झाडगाव गावातील शेतकरी गजानन व्यापारी, विनोद कूचेवार, गजु बोरजे, दिनेश मानकर,इसाक शेख, प्रकाश बोरकर, नितीन परतेकी , प्रमोद बोरकर, मारोतराव कूचेवार ,हर्षल फरकाडे तसेच शेतकरी उपस्थित होते.

# एकही नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित राहणार नाही;पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली ग्वाही

## थळपेठ येथे वाचनालयाच्या इमारतीचे लोकार्पण







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागरिकांना चांगले रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण या सर्व सुविधा पुरविण्याची जबाबदारी स्थानिक यंत्रणा म्हणून ग्रामपंचायतीची असते. मात्र या सुविधा अधिक दर्जेदार करून नागरिकांच्या जीवनात सुलभता आणण्यासाठी सरकारचे सहकार्य सर्वतोपरी असते. त्यातूनच पुढे अनेक कल्याणकारी योजना पुढे येतात. विद्यार्थी, नागरिकांच्या बौद्धिक विकासासाठी वाचनालयाची निर्मिती हा महत्वपूर्ण पुढाकार आहे. उथळपेठ गावात अशा अनेक दर्जेदार सुविधा प्रदान करताना कुणीही नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

जिल्हा खनिज प्रतिष्ठान, चंद्रपूर अंतर्गत मुल तालुक्यातील उथळपेठ येथे वाचनालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले. या इमारतीचे लोकार्पण करताना पालकमंत्री बोलत होते. यावेळी मुलचे उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, तहसीलदार मृदुला मोरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, उपकार्यकारी अभियंता प्रशांत वसुले, उथळपेठचे सरपंच पलिंन्द्र सातपुते, उपसरपंच भारती पिंपळे, नंदकिशोर रणदिवे, वर्षा लोनबाडे, सहायक अभियंता राठोड, पोलीस पाटील भाग्यश्री चिचघरे यांच्यासह ग्रामपंचायतचे सर्व सदस्य उपस्थित होते.

पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून उथळपेठमध्ये वाचनालयाच्या इमारतीसाठी २ कोटी ५० लक्ष रुपये निधी खर्चून वाचनालयाची इमारत बांधण्यात आली . गावातील वाचनालयाची इमारत भव्य आणि अत्याधुनिक सुसज्ज असल्याचे सांगत त्यांनी इमारतीच्या बांधकामावर समाधान व्यक्त केले. नागरिकांना महत्वाच्या सेवा देण्यासोबतच त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण करून बौद्धिक विकास साधण्याच्या दृष्टीने हे महत्वाचे पाऊल आहे. वाचनालयाची इमारत नागरिकांसाठी सेवाकेंद्र ठरावे, अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली. उथळपेठ गावात प्राधान्याने पांदण रस्ते बनविण्यासाठी निधी उपलब्ध करून देऊ. जात, पात, धर्म महत्वाचे नाही विकासासाठी आम्ही तत्पर आहोत, असे सांगताना त्यांनी जास्तीत जास्त घरकुल उथळपेठमध्ये व्हावेत, यासाठी प्रयत्न करू, असे आश्वस्त केले. उथळपेठ गावात ब्रिज कम बंधाराची मागणी अनेक दिवसांपासून आहे. ते लवकरच बांधून देऊ. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ उथळपेठच्या प्रत्येक बहिणीला मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असून समितीचा अध्यक्ष स्वतः असल्यामुळे योजनेच्या लाभापासून कुणीही वंचीत राहणार नाही, अशी ग्वाही देखील पालकमंत्री मुनगंटीवार यांनी दिली. शेतकरी बांधवांना केंद्र सरकार कडून ६ हजार आणि राज्य सरकारचे ६ हजार रुपये मिळत आहेत. मुलींच्या शिक्षणाचा पूर्ण खर्च आता सरकार उचलणार आहे. उद्या उथळपेठ गावातील मुलींना शिक्षणातील ध्येय या योजनेमुळे गाठता येईल. आता साडेसात हॉर्सपॉवरच्या पम्पांना शंभर टक्के वीज माफी दिली जाईल, अशी घोषणा देखील पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली.

### दिलेला शब्द पूर्ण केला

नागरिकांनी विकासासंदर्भात मागणी केली तेव्हा ती पुर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. चिचाळा व लगतच्या सहा गावांमध्ये बंद नलिका वितरण प्रणाली द्वारे सिंचनाची सुविधा उपलब्ध केली, टाटा ट्रस्टच्या सहाय्याने ९० गावांमध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविले, जे.के. ट्रस्टच्या माध्यमातुन दुग्ध उत्पादनाचा प्रकल्प राबविला.रस्ते,आरो मशिन, बंदिस्त नाल्या, कृषी वाचनालय आदी विकासकामे या गावात यापूर्वी पुर्णत्वास आणली. आज वाचनालय इमारतीच्या बांधकामाबाबत दिलेला शब्द पुर्ण होत आहे, याचा मनापासून आनंद होत आहे असेही ते म्हणाले.

# ना.सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्रात 'लाडकी बहीण' लाभार्थ्यांची गर्दी



**घुग्घुस । प्रतिनिधी**

महायुती सरकारने नुकतीच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' जाहीर केली असून, यातील अटी शिथिल करण्यात आल्या आहे. महिलांसाठी लाडकी बहीण योजना आणून त्यांना मदतीचा हात दिला आहे.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' घोषित झाल्यानंतर कागदपत्रे सादर करण्यासाठी घुग्घुस शहरातील ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात लाभार्थ्यांनी मोठी गर्दी केली.आतापर्यंत शेकडो लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले असून अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरून देण्यात येत आहे. ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र हे शासकीय योजना, दाखले काढून देण्यात अव्वल स्थानी आहे.

# गोंड– गोवारी अभ्यास समिती १५ व १६ जुलै रोजी नागपूरात

## सामाजिक संघटनांकडून स्विकारणार निवेदने

**गडचिरोली । प्रतिनिधी**

उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधिश के.एल.वडणे यांच्या अध्यक्षतेखाली गोंड-गोवारी समाजाच्या निवेदनावर अभ्यास समिती स्थापन असुन सदरच्या अभ्यास दौरा करीता वडणे हे दिनांक १५ व १६ जुलै रोजी रविभवन, शासकीय विश्रामगृह, नागपुर येथे उपस्थित राहणार आहेत. यावेळी ते नागपूर विभागातील गोंड गोवारी समाजाच्या संघटनाचे निवेदन स्विकारणार आहेत.

सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसुचीत जमाती प्रमाणपत्र समिती गडचिरोली कडुन गोंड-गोवारी समाजाच्या संघटना तसेच त्यांचे प्रतिनिधी यांना आवाहन करण्यात येते की, लेखी निवेदने सादर करावयाची असल्यास दि.१५ व १६ जुलै २०२४ रोजी रविभवन, शासकीय विश्रामगृह, नागपूर येथे सादर करावे. असे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, सहआयुक्त जितेंद्र चौधरी यांनी कळविले आहे.

# कृषीकन्यांनी शेतकऱ्यांना दिली बियाण्यांची माहिती



**आनंदवन । प्रतिनिधी**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ , अकोला अंतर्गत महारोगी सेवा समिती द्वारे संचालित आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, आनंदवन, वरोरा यांच्या विद्यमाने आनंदवन येथे शेतकऱ्यांना विविध बियाण्यांच्या प्रकारांबाबत मार्गदर्शन केले.

या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पोतदार , रावे प्रभारी डॉ. आर. महाजन , रावे समन्वयक डॉ. तायडे आणि मार्गदर्शक डॉ. अकोटकर व डॉ. मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.या उपक्रमात मधुरा नरवाडे,सायली गिरी ,अक्षता कुबडे, राजश्री खोब्रागडे ,नुपूर कटरे यांनी शेतकऱ्यांना बियाणाच्या विविध टॅगची माहिती दिली.

# आर्वी येथे धम्मपद ग्रंथ वितरण सोहळा व धम्म प्रबोधन,आंबेडकरी कवी संमेलन

**वर्धा । प्रतिनिधी**

आर्वी सिद्धार्थ बुद्ध विहार डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर आर्वी येथे धम्मपद ग्रंथ वितरण धम्म प्रबोधन मेळावा व आंबेडकरी कवी संमेलन पार पडले.या कार्यक्रमाचे उद्घाटन रवी भिमके यांनी केले. तरी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी सुरेश वंजारी नागपूर उपस्थित होते तर कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक तथा धम्मपद या ग्रंथाचे वितरक निळाईचे मुख्य संयोजक प्रा. प्रवीण कांबळे नागपूर हे होते. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी धम्म प्रचारक व ग्रंथपाल सुरेश भिवगडे, प्रा. डॉ.विजया मुळे अनिल मालके ज्येष्ठ गझलकार सूर्यकांत मुनघाटे, धम्म प्रचारक मधुकर सवाळे, सुनिता तायडे केंद्रीय शिक्षिका भारतीय बौद्ध महासभा कारंजा समाजसेविका यशोदाताई व्यंकटेश आत्राम भारती बनसोड ( गौतमी महिला बचत गट आर्वी ) भानुदास फुसाटे, अनिल खैरकर राजकुमार सोनटक्के आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरवात महाकारुणिक तथागत भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून वंदन करून त्रिशरण पंचशील घेऊन करण्यात आली. या कार्यक्रमा प्रसंगी सूर्यकांत मूनघाटे यांनी धम्मपदावर विश्लेषणात्मक मांडणी करत गाथांचे सुंदर विवेचन केले. तसेच प्रा. प्रवीण कांबळे यांनी धम्मपद हे प्रत्येक विहारात वाचले जावे व धम्मपदांच्या गाथांचा अर्थ समजून घेत आपल्या जीवनात उतरवण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले. याप्रसंगी आर्वी शहरातील बुद्ध



विहारांना धम्मपद उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भेट म्हणून देण्यात आले. याप्रसंगी धम्म सेविका सुनिता तायडे कारंजा यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल धम्मपद व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये महाप्रजापती गौतमी बुद्ध विहार वाल्मिकी वॉर्ड आर्वी, तक्षशिला बुद्ध विहार संजय नगर आर्वी, सिद्धार्थ बुद्ध विहार कन्नमवार नगर आर्वी, त्रिरत्न बुद्ध विहार जाम, भीमोदय बुद्ध विहार दत्त वॉर्ड आर्वी, सिद्धार्थ बुद्ध विहार डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर आर्वी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले निशुल्क अभ्यासालय वसंत नगर आर्वी, सिद्धार्थ सार्वजनिक वाचनालय कन्नमवार नगर आर्वी, प्रज्ञा शील करुणा ग्रुप आर्वी इत्यादींना धम्मपद वितरित करण्यात आले. याप्रसंगी आंबेडकरी कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते या आंबेडकरी कवी संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ कवी सुरेश वंजारी नागपूर हे होते. यावेळी प्रांजली व्यंकटेश आत्राम, सुरेश भिवगडे, प्रा. डॉ. विजया मुळे सूर्यकांत मूनघाटे भीमराव मनवर ई.कवींनी सुंदर अशा रचना सादर केल्या. या कार्यक्रमाला आर्वी शहरातील विविध बुद्ध विहारातील महिला उपासिकांची गर्दी होती. यावेळी उपस्थित पाहुणे मंडळीसाठी सामाजिक कार्यकर्त्या शुभांगी सुजित भिवगडे यांच्या वतीने अल्पोपहार व चहा देण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार जयंती उत्सव समितीचे महासचिव सुरेश भिवगडे यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन संडे मिशन आर्वी अंतर्गत व विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३३ वी जयंती उत्सव समिती आर्वी यांच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुजित भिवगडे यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

# विकासकामांना गती द्या अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा;अहेरी तालुका काँग्रेसची मागणी

**आनंद दहागावकार । गडचिरोली**

राज्याच्या पूर्व टोकावर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील दक्षिण भाग अतिशय महत्वाचा समजला जाते. मात्र, या परिसरातील नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. मागील अनेक वर्षांपासून या परिसरातील मुख्य रस्त्यांची दैनावस्था झाली असल्याने अहेरी तालुक्यासह सिरोंचा, भामरागड तालुक्यातील नागरिकांना कमालीचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या परिसरात सुरू असलेल्या विकासकामांना गती देण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष डॉ. अ. निसार शेख (हकीम) यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून मागणी केली आहे. अहेरी तालुक्यात अनेक वर्षांपासून असंख्य अश्या विविध समस्या आहेत. तरीही प्रशासकीय स्तरावरून फारशी दखल घेतली जात नसल्याने आणि त्या सोडवण्यासाठी फारसे प्रयत्न होताना दिसत नाही. गडचिरोली जिल्ह्याच्या दक्षिण टोकावर असलेल्या तालुक्यांपैकी अहेरी तालुका हा मुख्यालयाचे महत्त्वाचे ठिकाण असून. या तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी आल्याशिवाय जिल्हा मुख्यालय अथवा राज्यातील अन्य जिल्ह्यांकडे जाता येऊ शकत नाही. मात्र,अहेरी आलापल्लीवरून जिल्हा मुख्यालयाकडे येणाऱ्या जाणाऱ्या मुख्य मार्गाची दुरवस्था झाली आहे.आणि हे मुख्यालयाचे महत्त्वाचे ठिकाण



असून यासोबतच भामरागड-सिरोंचा रस्त्याची अतिशय बिकट अवस्था आहे. पावसाळ्याच्या दिवसांत आपात्कालीन परिस्थितीत कोणत्या मार्गाने आवागमन करायचे? यासंदर्भात... साहेब पर्यायी मार्ग सूचवा,असा टाहो तालुका काँग्रेस कमिटी अहेरी यांचा असून. मागील काही वर्षापासून अहेरी-आलापल्लीवरून आष्टीकडे येणाऱ्या मार्गाची दुरवस्था झाली आहे. शासनाने आष्टी ते लगामपर्यंतच्या रस्त्याची दुरुस्ती नव्हे सुधारणा केली आहे. मात्र, लगाम ते आलापल्ली हा २० किलोमीटरचा मार्ग वर्कऑर्डर मंजूर होऊनही कामाला सुरुवात झाली नाही. यात जवळपास २० किमी रस्त्याची दुरावस्था 'जैसे थे'च आहे. यामुळे या मार्गाने प्रवास करणे आव्हानात्मक आहे. लगाम ते आलापल्ली अहेरी पर्यंतच्या मार्गाचा दुरावस्था झाली आहे.त्यामुळे कोणत्या मार्गांनी प्रवास करावे हा प्रशन निर्माण झाला आहे.आणि पूर्ण झालेल्या पुलांचा दर्जा निकृष्ट आहे. त्यामुळे भविष्यात मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत प्राणहिता अहेरी या मार्गाचेच काम पावसाळ्याअगोदर पूर्ण करण्याची तरतूद असतानाही कंत्राटदाराच्या कार्यशैलीमुळे या मार्गाचे काम थांबले आहे. याशिवाय अन्य समस्या प्राधान्य क्रमाने सोडविण्यात याव्या. तसेच विकासकामांचा दर्जा उत्तम ठेवून कामे तातडीने पूर्ण करावे. येत्या ७ दिवसांत यावर उपाययोजना न केल्यास अहेरी तालुका काँग्रेस कमिटीतर्फे तीव्र आंदोलनाचा इशारा निवेदना मार्फत देण्यात आले आहे.तहसीलदारांना निवेदन देताना तालुका काँग्रेस अध्यक्ष डॉ. अ. निसार हकीम, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपाध्यक्ष रवींद्रबाबा आत्राम, रज्जाक कुरेशी, रागोबा गौरकर, अशोक आत्राम, गणेश उपलपवार, श्रीनिवास गंधमवार, नितीन पटवर्धन, राकेश तलांडे, नितीन बंडमवार, विशाल गजाडीवार, रुपेश बंदेला, सुरेश दुर्गे आदी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .